MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## ‘तिरुमला’चे सुरेश कुटे, अर्चना कुटेंना बेड्या:कोट्यवधींच्या ज्ञानराधा बँक घोटाळ्यात कारवाई; पुण्याहून बीडला आणले, ठेवीदार आक्रमक

बीड-बीडच्या राज्यभर गाजलेल्या कोट्यवधी रुपयांच्या ज्ञानराधा बँक घोटाळ्याप्रकरणी तिरुमला उद्योग समूहाचे प्रमुख सुरेश कुटे, त्यांना पत्नी अर्चना कुटे आणि सहसंचालक आशिष पाटोदेकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बीड पोलिसांनी पुण्यात ही कारवाई केली आहे.

पोलिसांनी सुरेश कुटे यांना सायंकाळी ५ वाजेपर्यंत ज्ञानराधा बँकेच्या घोटाळ्यासंबंधीचे दस्तऐवज सादर करण्याची मुदत दिली आहे. त्यानुसार कुटे यांना ठेवीदारांच्या ठेवी कसे परत करणार तसेच आरबीआय सोबत झालेला पत्रव्यवहार इत्यादी कागदपत्रे पोलिसांना सादर करायची आहेत.

सुरेश कुटे आणि त्यांच्या पत्नी अर्चना कुटे आणि ज्ञानराधाचे संचालक आशिष पाटोदेकर यांना बीड पोलिसांनी शुक्रवारी पहाटे साडेचार वाजता पुण्यातील हिंजवडी येथील राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्यानंतर आज दुपारी तीन वाजता बीड जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात कारने आणण्यात आले. दरम्यान आज सायंकाळी पाच वाजेपर्यंत आवश्यक ती कागदपत्रे आणि पुरावे सादर करण्याची डेडलाइन सुरेश कुटे यांना देण्यात आली आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२५५ शुक्रवार दि.०७ जुन २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -255 FRIDAY DT. 07 JUNE 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# अजुनही ब्वॉ ‘राडे’ सुरुच

# बीडची बी अँड सी विक्रीला काढली

## टक्केवारीचा खेळ जोरात चालू बीड नगरपरिषद हद्दीतील अनेक काम न करता बिलं उचलण्याची तयारी एमटी कंट्रक्शनची ?

(६) बीड नगरपरिषद नगरपंचायत जि. बीड क्षेत्रातील कामे

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रभाग २ मध्ये माळीवेस बौध्द विहार कॉर्नर ते भास्कर विद्यागर यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| २ | प्रभाग १८ शास्त्रीनगरमध्ये ऐश्वर्या बियर बार ते नवले शाळेपर्यंत सिमेंट सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ३ | प्रभाग ११ आदित्यनगरी मध्ये बालाजी पवार ते श्री श्री रविशंकर इंग्लीश स्कुल सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| ४ | प्रभाग २२ शिराळेनगर मध्ये नवनाथ शिराळे ते सोनवणे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ५ | प्रभाग ४ वत्तारवेस मध्ये जितेंद्र सौदा ते राकेश झिंझोट यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |

पृष्ठ १४ पैकी १०

शासन निर्णय क्रमांकः- नपावै-२०२३/प्र.क्र.३२७(२८)/नवि-१६, दिनांक ३१ जुलै, २०२३

| अ. क्र. | कामाचे नांव | रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| ६ | प्रभाग १४ अभियंतानगर बापुराव डोके ते पंचमुखी हनुमान मंदिर पर्यत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ७ | प्रभाग २० गजानननगर कॉर्नर ते जमाल बागवान यांचे घर नाशिर रिक्षावाला मार्गे मुनीर किराणा दुकानापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ८ | प्रभाग २३ नुतन कॉलनी मध्ये रवि वाघमारे ते शांतीनाथ डोरले यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ९ | प्रभाग ०२ सहयोगनरमध्ये गित्ते ससाणे ते दत्ता शिंदे यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १० | प्रभाग ०७ छापखाना गल्ली गणपती मंदिर ते लक्ष्मीदेवी मंदिर सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| ११ | प्रभाग १२ बालेपीर भारतभूषणनगर मध्ये नगर रोड ते गायकवाड यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १२ | प्रभाग १४ संभाजीनगर मध्ये पालवण रोड ते दिलीप पवार यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १३ | प्रभाग १५ चाणक्यपुरी मध्ये हनुमान मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक करणे बीड | १०.०० |
| १४ | प्रभाग ०५ मोची गल्लीमध्ये पवार बिल्डिंग ते अर्जुन वडतिले यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १५ | प्रभाग १३ गोविंदनगर, विवेकानंद शाळा ते वाव्हळ यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १६ | प्रभाग १७ धांडे गल्ली, हर्षद शेख ते मुळूक यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १७ | प्रभाग ०३ शुक्रवार पेठ बीड मंत्री कन्ट्रक्शन मध्ये तळेकर यांचे घर ते भोसले यांचे घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे | १०.०० |
| १८ | प्रभाग ११ मुख्य रस्ता ते समर्थनगर बीड सिमेंट रस्ता करणे | [illegible] |
| १९ | बीड शहर अंतर्गत हॉटेल शिल्पा ते भगवान हॉस्पिटल नाली दुरुस्ती करणे | १०.०० |
| २० | प्रभाग ०३ हनुमाननगर एमआयडीसी येथे सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे | १०.०० |
| | एकुण रक्कम रु. (लक्ष) | २००.०० |

11 / 14

बीड बी अँड सी चा भागवत नावाचा इंजिनियर मूर्ती लहान पण कीर्ती महान सर्वांच्या टक्केवारी घेण्यामध्ये भागवत माहीर काम न करताच बिल मस्केच्या कंट्रक्शन ला देण्याची तयारी?

बीड शहरातील नगरपरिषदची ना हरकत प्रमाणपत्र घेत एमटी कंट्रक्शनने २० ते २२ कामाचे कोट्यावधी रुपये फुकट उचलण्याचे तयारीत.?

एम. टी कंट्रक्शनच्या बोगस कामाचे बिलं काढण्याची जबाबदारी बी अँड सी च्या बोराडे तोंडेनी भागवत यांनी घेतली. ?

राजेंद्र मस्के,मदन मस्केच्या कन्ट्रक्शन च्या बीड तालुक्यातील सर्व कामांची चौकशी होणे गरजेचे. ?

बीड तालुक्यातील अनेक भागातील अनेक कंट्रक्शनला बीड तालुक्यातील बोगस बीले उचलून देण्याची बोराडेची तोंडे भागवत सह अन्य इंजिनियरची तयारीत.?

बीड नगर परिषद कडून ना हरकत प्रमाणपत्र घेऊन कोट्यावधी रुपयांचे बीलं बी अँड सी मार्फत गुत्तेदाराच्या घशात घालण्याचे काम यावेळी चंद्रकांत बोराडे, रवि तोंडे, भागवत करत आहेत.

## हीच ती कामे जी भाजपाच्या कार्यकर्त्यांना मिळालेली कामे सर्जा-राजाच्या जोडीने गिळकृंत केली



बीड नगरपरिषद अंतर्गत बीड शहरातील आणि गल्ली प्रभाग वार्डामध्ये काम झालेली आहेत हेच काम आता शासनाकडून नगरसेवक यांच्या विरोधात जात बीड शहरातील जिल्ह्यातील नेते हे कोटयावधी रुपयाचा निधी महाराष्ट्र शासनाकडून मुंबई मंत्रालयात जाऊन टक्केवारी देऊन आणत आहेत तर या ठिकाणी बोगस बिले उचलण्याचे काम यावेळी बीडच्या मधून बोराडे तोंडे भागवत हे करत आहेत तर यावेळी मात्र घरच केला आहे की सत्तेत असलेल्या भाजपा किती जिल्हाधिकारी राजेंद्र मस्के यांनी तर बीड जिल्ह्यामध्ये अनेक कंट्रक्शन च्या माध्यमातून व त्यांच्या भाऊ भावाच्या नावाने असलेले कंट्रक्शन एम टी कंट्रक्शनच्या माध्यमातून मस्के यांनी कोणत्याही रूपाची बोगस बिले उचललेले यावेळी बीड जिल्ह्यातील जनतेच्या निदर्शनास येत आहे परंतु बोराडे तोंडे हे मस्के यांचा खिसा भरण्यामध्येच माहीर झाले आहेत तर त्या खिशातून त्यांनाही टक्केवारी मिळत असल्याची चर्चा यावेळी ऐकायला मिळत आहे

बीड /प्रतिनिधी

प्रीतम ताई मुंडे यांनी यांनी त्यांच्या खासदार फंडातून व महाराष्ट्र शासनाकडून पट्ट्या स्वरूपाचा निधी बीड जिल्हा भाजप पदाधिकाऱ्यांना दिला होता हा निधी देत असताना शहराचा विकास ही तितकाच महत्त्वाचा होता परंतु प्रीतम ताई मुंडे कोट्यावधी रुपयाचा निधी फक्त गुत्तेदार पोचण्यासाठी प्रीतम मुंडे यांनी दिला आहे या अगोदर सुद्धा राजेंद्र मस्के भाजपाचे जिल्हाध्यक्ष यांनी हा निधी देत असताना जातीचा भेद निर्माण करण्याची भिंत राजेंद्र मस्के व प्रीतम ताई मुंडे यांनी उभा करत आपल्या समाजाला फक्त हे काम दिल्याची चर्चा बीड शहरामध्ये जोर धरू लागली आहे असेच काही काम या अगोदर सुद्धा राजेंद्र मस्के यांनी जवळपास २० कोटी रुपयांचे काम कार्यकर्त्यांच्या नावावरती पक्ष संघटना कार्यालयातून आणले आणि या ठिकाणी स्वतःच तो मलिदा खाल्ल्याची चर्चा आहे आणि यावेळी मात्र बीड नगर परिषदेत मधून बीड नगर परिषद हद्दीतील बीड शहरातील २० ते २२ गल्ली बोळात सिमेंट रोड नालीचे काम करण्यासाठी बीडच्यामाजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी दोन कोटी वीस लाख रुपयांचा दिलेला निधी बीड शहरातील नगरपरिषद अंतर्गत काम करण्यासाठी व कार्यकर्ते पोचण्यासाठी प्रीतम ताई मुंडे यांनी संबंधित निधी दिला होता.? परंतु बीडचे भाजपाचे नेते व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी तो निधी स्वतःच्या भावाच्या नावावरती म्हणजे एमटी कंट्रक्शन वर टेंडर भरून स्वतःच्या भावाला हे टेंडर देऊन बीड शहरातील जवळपास २०ते २५ कार्यकर्त्यांना बीड शहरातील बी अँड सी मार्फत काम काम करत आहेत परंतु हेच याच २० ते २२ कामांना मात्र बीड नगर परिषदेने या अगोदर या प्रभाग वार्ड गल्ली मधून हे काम म्हणजेच सिमेंट रोड नालीचे झालेले असलेल्या प्रभाग वार्ड कल्याण मध्ये सिमेंट रोड नालीचे काम टाकले आहेत बीडमध्ये दोन ते अडीच कोटी रुपयांचा निधी हडप करण्याचा डाव यावेळी मस्के बंधूंनी केलेला आहे परंतु प्रीतम मुंडे यांच्या लक्षात हे का येत नसेल असा प्रश्न यावेळी जनतेला पडलेला आहे तर काम वेगवेगळ्या भागांमध्ये बीड शहरातील २२ काम असून यामध्ये २० ते २२ कामांमध्ये मात्र सर्व काम या अगोदरच बीड नगरपरिषद अंतर्गत हे काम झालेले होते परंतु राजेंद्र मस्के यांनी शक्कल लढवून तेच काम बी अँड सी चे चंद्रकांत बोराडे यांना हाताशी धरत संबंधित निधी हा स्वतःच्या भावाच्या घशात घालण्याचे पाप यावेळी राजेंद्र मस्के यानी केल आहे. मदन मस्के यांनी करत यावेळी ही खेळी केली आहे परंतु बीड नगरपरिषद या अगोदर या प्रभाग या गल्लीतील काम केलेली असताना त्याच गल्लीत डबल काम कसे काय करतात त्या ठिकाणची सध्याची परिस्थिती पाहता हे काम झालेले असल्यामुळे बोगस पद्धतीने फक्त बिल उचलण्याचे काम या ठिकाणी होण्याची दाट शक्यता आहे आणि एम टी कंट्रक्शन च्या घशामध्ये कोट्यावधी रुपयाचा निधी घालण्याचे पाप चंद्रकांत बोराडे व इंजिनियर भागवत हे करत आहेत..

हेच काम बीड शहरातील माझे कंट्रक्शन ने भरले होते परंतु माझेच कंट्रक्शन चे सर्वेस्वार यांची काही कार्यकर्त्यांनी भेट घेऊन आमचे काम आहेत हे राजेंद्र मस्के यांचे भाऊ मदन मस्के यांच्या एजन्सीवर पडले आहे आमच्या लेकरा बाळांचा उपवासा प्रश्न आहे अशी विनंती केल्यानंतर मोठ्या मनाने माझेच कंट्रक्शन यांनी म्हणजेच मजेत कंट्रक्शन चे सर्वेस्वार शेख माझेद साहेब यांनी मोठे मन करत आपलं टेंडर मागे घेऊन त्या २० ते २२ कार्यकर्त्यांच्या भावनांचा सन्मान केला आणि नंतर ते काम आहे मदन मस्के यांचे एम टी कंट्रक्शन वरती ते काम दिलं परंतु यावेळी सर्व कार्यकर्त्यांनी मदन मस्के यांचा सत्कार ही केला मदन मस्के यांचा सत्कार केल्यानंतर यावेळी मात्र मदन मस्के व राजेंद्र मस्के यांची नियत फिरली आणि त्यांनी कार्यकर्त्यांच्या तोंडाचा घास काढून स्वतःच्या भावाच्या घशामध्ये घातला याचाच प्रभाव म्हणून बीड शहरातून पंकजा मुंडे यांना लीड कमी मिळाली ती चर्चा यावेळी बीड भाजपच्या काही कार्यकर्त्यांकडून ऐकायला मिळत आहेत.

बोराडे, भागवत, यांनी बीड तालुक्यातील मार्फत झालेले अनेक कामांची चौकशी होणे गरजेचे.? जनतेच्या सोयी सुविधांसाठी शासन विविध योजना राबवित असते. त्या योजनांचीअंमलबजावणी योग्य रीतीने झाली तर यामधून जनतेचे आणि पर्यायाने राज्याचे हित साधले जाते. मात्र या योजनेच्या अंमलबजावणीत कोणी खोडा घातला आणि या योजनेतून स्वार्थीपणाने काम केले तर योजनाही बारगळते आणि शासनाचा पैसाही पाण्यात जातो. शिवाय जनतेलाही सुविधा मिळत नाहीत, राज्यातील रस्ते चांगले झाले पाहिजेत म्हणून राज्य शासन या ठिकाणी निधी देत आहे. बीड नगरपरिषदेला केंद्र राज्य शासनाच्या वतीने पट्ट्यावर रूपाचा निधी देण्यात आलेला बीड शहरातील नाणी रस्ते सुधारणा योजनेसाठी विविध योजना या ठिकाणी मार्फत राबविण्यात आलेले आहेत याच बीड नगर परिषद विविध काम या योजनेमार्फत करण्यात येत आहेत व काही काम करण्यातही आलेले आहेत हे काम करत असताना भागवत नावाचा इंजिनिअर हा मूर्ती लहान पण कीर्ती महान आहे भागवत च्या नेतृत्वाखाली झालेल्या सर्व कामाची चौकशी होणे गरजेचे आहे तर भागवत चा साहेब असलेला चंद्रकांत बोराडे आणि चंद्रकांत बोराडे यांचा साहेब असलेला रवी तोंडे यांची सगळ्यांची चौकशी होणे गरजेचे आहे या काम या दीड शहरातील व ग्रामीण भागातील झालेले आहेत त्याच कामावरती पुन्हा डबल बिल उचलण्याचे काम यावेळी भागवत बोराडे तोंडे यांच्याकडून करण्यात येत आहे यासह अनेक इंजिनियर हे बीड सार्वजनिक बांधकाम विभाग एक व दोन मध्ये रुपयाची टक्केवारी घेऊन गुत्तेदारांच्या घशामध्ये व नेते मंडळीच्या घशामध्ये बिल घालण्याचे काम करत आहेत.

# पवारांचा एकटा शिलेदार डझनभर सत्ताधाऱ्यांना पुरून उरला

## बीडच्या राजकीय रणसंग्रामात आ.संदीप क्षीरसागर ठरले किंगमेकर

**बीड ।प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील सत्ताधारी पक्षाचे सर्व आमदार, खासदार, पालकमंत्री सर्वांनी एकत्र येऊन लोकसभा निवडणुकीत आपली ताकद लावली परंतु बीड मतदारसंघाचे आमदार तसेच राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष असलेले आ.संदीप क्षीरसागर या शरद पवारांच्या एकट्या शिलेदाराने सगळ्या सत्ताधारी पुढार्यांना शह आणि मात एकाच वेळी दिली. आणि बीड लोकसभा निवडणुकीच्या रणसंग्रामात आणि जनतेला लोकमान्य असलेला खासदार मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उभी फूट पडल्यानंतर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व आमदार अजित पवार यांच्यासोबत निघून गेले. फक्त बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर, शरद पवार यांच्या पुरोगामी विचारांशी एकनिष्ठ राहून शरद पवारांच्या मुळ राष्ट्रवादीत राहिले. बीड जिल्ह्यात अगोदरच भाजपा चे २ विधानसभा सदस्य आणि १ विधानपरिषद सदस्य असे ३ आमदार होते. त्यात राष्ट्रवादीचे ३ आमदार महायुतीत सहभागी झाले. त्यामुळे एकूणच जिल्हाभरातील सगळे पुढारी सत्तेच्या बाजूला गेले. परंतु पहिल्यांदाच आमदार झालेले संदीप क्षीरसागर यांनी आपल्या भूमिकेवर ठाम राहून पवार साहेबांशी एकनिष्ठ राहण्याचा निर्णय घेतला. अर्थातच हे खूप मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यातच पक्षाने त्यांच्यावर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सोपवली.

त्यानंतर आ.क्षीरसागर यांनी जिल्ह्यात पवार साहेबांशी एकनिष्ठ राहणार्या मुठभर नेत्यांना सोबत घेऊन जिल्हाभरात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची यंत्रणा उभी केली. आणि अशातच लोकसभा निवडणूक जाहीर झाली आणि महाविकास आघाडीकडून बजरंग सोनवणे यांना उमेदवारी देण्यात आली. उमेदवारी जाहीर झाल्यापासून बजरंग सोनवणेंना निवडून आणण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी अक्षरशः दिवसरात्र एक केले आणि शेवटी बीड लोकसभा मतदारसंघात अकार्यक्षम प्रस्थापितांना त्यांची जागा दाखवून दिली. सत्तेचे आपल्याच घरात केंद्रीकरण करणार्या जिल्ह्यातील प्रवृत्तीला जोरदार चपराक आ.संदीप क्षीरसागरांच्या नेतृत्वाने यावेळी दिली आहे. बीड मतदारसंघातून खा.बजरंग सोनवणेंना सर्वाधिक ६१ हजाराहून अधिकची लीड मिळवून देत आपला शब्द पूर्ण करत आ.संदीप क्षीरसागर किंगमेकर ठरले आहेत.




## तरनळी येथे शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा

केज /प्रतिनिधी

दि.६ जुन २०२४ गुरुवार रोजी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन केले तसेच ध्वजारोहण करण्यात आले व शिवस्वराज्य दिन उत्साहात साजराकरण्यात आला.या कार्यक्रमास सरपंच श्री.महादेव खेडकर,उपसरपंच शिवाजी मोहिते,ग्राम पंचायत सदस्य,गावकरी, ग्रामविस्तार अधिकारी श्री.नागरगोजे साहेब, सेवानिवृत्त मुख्याद्यापक श्री भारत मोहिते,जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी या शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम,शिक्षक, शिक्षिका वृंद ,विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.



## पर्यावरण दिन:सामाजिक वनीकरण कडून विविध उपक्रम

परळी ।प्रतिनिधी

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त परळी तालुका सामाजिक वनीकरण विभागाकडून परळी शहरातील रेल्वे स्थानक परिसरात वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त परळी वन परिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण परळी यांच्या वतीने दक्षिण मध्य रेल्वेच्या परळी रेल्वे स्थानक आणि कर्मचारी निवासी वसाहत भागात वृक्षारोपण आणि सिड बॉल रोपन करण्यात आले.यावेळी परळी रेल्वे स्थानकचे स्टेशन मास्टर, कर्मचारी पांडे, आरपीएफ,एसडीआरएम, सीएसआय चे संपूर्ण स्टाफ सामाजिक वनीकरण विभागाचे वनक्षेत्रपाल जाधवर ,सामाजिक वनीकरण वनपाल अनिल मालेवार,जगतकर काळे सामजिक वनीकरण विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी पर्यावरण विषयक जन जागृती करून रॅली काढून पर्यावरण वाचवण्याची शपथ घेण्यात आली.

# सोशल मिडीयावर वादग्रस्त पोष्ट केल्यास पोलिस कारवाई करणार

### पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन

केज ।प्रतिनिधी

केज शहरातील सर्व सुजाण नागरिकांस आवाहन करण्यात येते की,केज शहरातील सोशल मीडियावर काही समाजकंटक लोक वेगवेगळ्या ग्रुपवर किंवा दुसऱ्याच्या पोस्ट खाली कमेंट बॉक्समध्ये किंवा सोशल मीडियावर कुठेही आक्षेपार्ह पोस्ट करत आहेत तसेच स्टेटस ठेवत आहेत.अशा पोस्ट समाजा मध्ये अशांतता दुही पसरवत आहेत असे आंपणास कुठेही निदर्शनास आल्यास त्याची माहिती व त्याचे नाव मोबाईल नंबर पोस्ट चा फोटो पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन,पोलीस स्टेशन केज शहर यांचा मोबाईल क्रमांक



९८२१७२९२२३ या नंबर वर किंवा ठाणे अंमलदार यांचा ९०११६५६५११ या मोबाईल क्रमांकावर पाठविण्यात यावेत.यामुळे संबंधितावर कारवाई करून शहरातील कायदा सुव्यवस्था,शांतता अबाधित ठेवण्यास सहाय्य होईल असे आवाहन श्री.प्रशांत महाजन,पोलीस निरीक्षक केज यांनी केले आहे.

## शंकी गोगलगाय नियंत्रणासाठी उपयोजना

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील तीन वर्षापासून सोयाबीन कापूस भाजीपाला आदी पिकांवर शंकी गोगलगायीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सोयाबीन पिकांमध्ये रोप अवस्थेतच गोगलगायींचा प्रादुर्भाव होत असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. या गोगलगायींना वेळीच ओळखून खालील प्रमाणे उपाययोजना करणे गरजेचे आहे जेणेकरून पुढील नुकसान टाळता येईल.

# बीड जिल्हयाच्या जनतेचा आशीर्वाद शरद पवार यांच्यावरच-सौ.सूदामती गुट्टे

परळी (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील जनता नेहमी सर्वसमावेशक सकारात्मक राज्याचे आणी देशाचे नेतृत्व करणारे खा.शरद पवार यांच्या पाठिशी राहुन आशीर्वाद देते हे पुन्हा एकदा लोकसभेच्या निवडणुकीत बजरंग सोनवणे बप्पांच्या विजयाने दाखवून दिले असुन बीड जिल्हयाच्या जनतेचे धन्यवाद आणी आभार राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठनेत्या सौ.सूदामतीताई गुट्टे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.

भाजप पक्षानी शरदचंद्रजी पवार साहेबाना राजकारणात रोखण्यासाठी अजित पवार यांच्या माध्यमातून पक्ष फोडून आपल्याशी केले.परंतु महाराष्ट्रातील जनता ख-या अर्थाने कोणाच्या बाजूने आहे हे दाखवून दिले.बीड जिल्ह्यातही केवळ आ.संदिप क्षिरसागर वगळता व आमच्या सारखे सर्व सामान्य कार्यकर्ते खा.शरद पवार यांच्यावर प्रेम करणारे मावळे सोडता पक्ष फोडाफोडीत जिल्ह्यातील आमदार,यांच्या आशीर्वादाने मोठे झालेले सर्वच पक्षाला व खा.शरद पवार यांना सोडून गेले होते.या संकटाच्या काळात बीड मध्ये काय होईल हे कोणी सांगु शकत नव्हते.परंतु खा.शरद पवार यांच्यावर करणाऱ्या व आमच्या सारखे मावळे या जिल्ह्यातील सर्व सत्ता केंद्र ताब्यात असणाऱ्या मात्तबर नेत्याच्या हाकेला,दहशतीला भिक न घालता बीड जिल्ह्यातील जनता भाजप व त्यांच्या मित्र पक्षाला साथ न देता खा.शरद पवार यांच्या बरोबर राहुन बजरंग बप्पा सोनवणे यांच्या सारख्या शेतकरी पुत्रा बरोबर राहिली या विजयात जिल्ह्यातील महाविकास आघाडीतील काँग्रेस,उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गट व मित्र पक्षाची मोठी साथ मिळाली असुन विशेषतः परळी विधान सभा मतदारसंघात दहशत निर्माण करुन बुथ ताब्यात घेऊन बोगस मतदान करुन मतदारसंघात विक्रमी लिड घ्यायची आणि



आपले मनसुबे यशस्वी करायचे या नियतीला ते मान्य नव्हते लाख मताची लिड घेऊ पाहणाऱ्याना परळी मतदारसंघातील जनतेने मतदानाच्या माध्यमातून दाखवून दिले कि आम्ही कोणाचे गुलाम नाहीत संविधानाने दिलेला आमचा अधिकार काय असतो अश्या या परळी मतदारसंघातील बहादर जनतेचे धन्यवाद व जाहीर आभार व्यक्त करावे तेवढे कमीच आहेत असे राष्ट्रवादी काँग्रेसच्या जेष्ठनेत्या सौ.सूदामतीताई गुट्टे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.

# लाचलूचपत विभागाच्या कारवाईत ग्राम सेवक मधुकर बाबुराव गोरे चतूर्भूज

मानवत (प्रतिनिधी)

मानवत तालूक्यातील मौजे पोहंडूळ येथे डी.पी.डी.सीच्या निधी मधून मंजूर झालेल्या रकमेतून तेथील नाली व सिमेंट रोड तयार करण्याचे काम केलेले होते. दिनांक ०६/०५/२०२४ रोजी तक्रारदार यांनी वरील प्रमाणे केलेल्या कामाचे धनादेश मिळविण्यासाठी ग्रामसेवक मधुकर गोरे, ग्रामविकास अधिकारी, पोहंडूळ यांची भेट घेवून धनादेश घेतला. त्यानंतर सदर धनादेश तक्रारदार यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी आवश्यक असलेल्या ठढत्रड फॉर्मवर आलोसे मधुकर गोरे यांची सही व शिक्का आवश्यक असल्याने सदरचे सही व शिक्का देण्यासाठी आलोसे मधुकर गोरे यांनी तक्रारदार यांना २०,०००/- रुपये लाच मागितली. सदर लाचेची रक्कम न दिल्यास आलोसे मधुकर गोरे हे ठढत्रड फॉर्मवर सही व शिक्का देणार नाही या भितीने तक्रारदार यांनी त्यांच्या कडे असलेले ४,०००/- रूपये आलोसे मधुकर गोरे यांना लागलीच दिले. त्यानंतर उर्वरित १६,०००/- रूपये ठढत्रड फॉर्म वर सही व शिक्का घ्यायचे वेळी आणून देण्यास सांगितले. सदर रक्कम ही लाच असल्याने व तक्रारदार यांना लाच द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १३/०५/ २०२४ रोजी एसीबी परभणी कार्यालयात तक्रार दिली. दि.१३/०५/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांना मिळालेला धनादेश त्यांचे बँक खात्यात जमा करण्यासाठी आवश्यक असलेल्या ठढत्रड फॉर्मवर आलोसे मधुकर गोरे यांनी सही व शिक्का देण्यासाठी तडजोडी अंती १०,०००/- रूपये लाचमागणी केल्याचे निष्पन्न झाले.त्यावरून दि.०५/०६/२०२४ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे गोरे यांनी तक्रारदार यांचेकडून १०,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली आहे. त्यावेळी आलोसे मधुकर गोरे यांना लाचेच्या रकमेसह लागलीच ताब्यात घेण्यात आले आहे. या संबंधाने पो.स्टे. मानवत येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई डॉ. राजकुमार शिंदे पोलीस अधक्षिक अँटी करप्शन ब्यूरो नांदेड याच्या मार्गदर्शक पोलीस उप अधीक्षक अशोक इप्पर अँटी करप्शन ब्युरो परभणी व पोलीस निरिक्षक सदानंद वाघमारे अँटी करप्शन ब्युरो परभणी यांच्या पथकाने कारवाई केली.

# राज्यात शनिवार पासून जोरदार पाऊस

उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना आता पावसाची प्रतिक्षा आहे. शेतकरीच नाही तर शहरातील नागरिकांना ही आता पावसाची वाट पाहावी लागत आहे. दरम्यान पावसाबाबत आज एक मोठी अपडेट आली आहे. आज पाऊस तळकोकणात दाखल होण्याची शक्यता आहे.

राज्यात शनिवारपासून जोरदार पाऊस सुरु होणार असल्याची शक्यता आहे. मॉन्सूनच्या वाटचालीसाठी राज्यात पोषक स्थिती आहे. बुधवारी मोसमी पाऊस तळकोकणात दाखल होणे अपेक्षित होते. पण प्रत्यक्षात मॉन्सून गोव्यातच अडखळला आहे. आज तळकोकणात मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे. शनिवारपासून पुढील तीन दिवस राज्याच्या बहुतेक भागात जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. केरळमध्ये दोन दिवस आधीच पाऊस दाखल झाला आहे. त्यामुळे



येत्या १० जूनपर्यंत मान्सून मुंबई आणि महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे.

प्री मान्सूनची शक्यता

मान्सून दाखल होण्याच्या आधी राज्यात प्री मान्सून पाऊसाची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. मुंबईसह काही भागात हा प्री मान्सून पाऊस पडू शकतो. पण प्रत्यक्षात मात्र मान्सूनच्या पावसाला १० जूननंतरच सुरुवात होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून उकाडा वाढल्याने मुंबईसह राज्यात लोकं हैराण झाले आहेत. पण येत्या २-३ दिवसात प्री मान्सून पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळू शकतो.

उत्तर भारतात उष्णतेची प्रंचड लाट आहे. गुजरात, राजस्थान आणि दिल्लीमध्ये तापमानाने रेकॉर्ड ब्रेक केला आहे. राजस्थानाच तापमान ५० अंशांच्या वर गेला आहे. त्यामुळे उष्णतेच्या लाटेमुळे घराबाहेर पडणे ही कठीण झाले आहे.

मान्सून दक्षिण महाराष्ट्रात होणार दाखल

हवामान खात्याच्या माहितीनुसार आता नैऋत्य मान्सून वेगाने पुढे सरकत आहे.पुढील ३ दिवसात नैऋत्य मान्सून हा कर्नाटकच्या उर्वरित भागात त्यानंतर दक्षिण महाराष्ट्रातील काही भाग पोहोचेल. नैऋत्य मान्सून १० जूनपर्यंत महाराष्ट्रात दाखल होण्याची शक्यता आहे.

शनिवारी मान्सून कोकण किनारपट्टीवर धडकू शकतो. ज्यामुळे पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने म्हटले की, आजपासून अनेक भागाच अंशतः ढगाळ वातावरण राहिल. काही ठिकाणी हलका पाऊस होऊ शकतो.

उत्तर-पश्चिम भारतात काही ठिकाणी पाऊस होण्याची शक्यता आहे. आयएमडीने म्हटले आहे की आसाम आणि मेघालयमध्ये ०७ ते ०८ जून दरम्यान जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

### या राज्यात मुसळधार पावसाची शक्यता

आज अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगालमध्ये गडगडाटी वादळासह पाऊस होण्याची शक्यता आहे. केरळ, लक्षद्वीप, अंदमान आणि निकोबार द्वीपसमूह, कर्नाटकात गडगडाट, विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. आज कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. ईशान्येकडील राज्यांना अजूनही उष्णतेपासून दिलासा मिळण्याची शक्यता नाही. या राज्यांमध्ये अजूनही उष्णतेची लाट कायम राहणार आहे. खचऊ ने सांगितले की ८ ते ९ जून दरम्यान उत्तर भारतात उष्णतेची लाट निर्माण होण्याची शक्यता आहे.

# आला जून चा महिना, झाडे लावा-झाडे जगवा!

नुकताच जगभरात ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने पुन्हा एकदा नेहमीप्रमाणे झाडे लावा-झाडे जगवा हा संदेश देण्यात आला. हा संदेश फक्त म्हणून, लिहून किंवा वाचून उपयोग नाही तर प्रत्यक्षात झाडे लावण्याची कृती करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. काल ६ जून रोजी बीडहून औरंगाबादला जावून आज दिनांक ७ जून रोजी परत आलो असता प्रवासात जाता-येताना रस्त्याच्या दोन्ही बाजूने संपूर्ण सव्वाशे किलोमीटर पर्यंत नजर मारली असता काय दिसले तर रखरख रान आणि रस्त्याच्या दुतर्फा रूक्ष साईड पंखे. हे पाहून मन भूतकाळात गेले. जेव्हा शालेय शिक्षण घेत असताना दिवाळीच्या किंवा उन्हाळयाच्या सुट्ट्या लागल्यावर आजोळी दौलताबादला जायचो. तेव्हा काय दिसायचे तर रस्त्याच्या दुतर्फा मोठमोठी लिंबाची, वडांची, उंबर, बाभूळ, चिंच, आंबे यासारखी मोठ मोठी आणि शुद्ध भारतीय झाडे. रानावनात सुद्धा या झाडांची कमतरता नव्हती. बसच्या खिडकीतून बाहेर पाहिल्यावर पाहतच राहावे असे वाटायचे. अशी हिरवीगार व मोठमोठी झाडे पाहता पाहता मान सुद्धा आकडायची पण मनाला अपरिमित आनंद व्हायचा. मात्र आज जी अवस्था दिसते ती पाहू वाटत नाही. एवढी भीषण अवस्था झाली आहे. गेल्या काही वर्षात आपणच मोठ्या प्रमाणात झाडांच्या कत्तली केल्या. यामुळे आज सगळीकडे कसं रखरख आणि रुक्ष दिसून येतं. झाडे कमी झाल्याने माणसांसह जनावरांना मिळणारी नैसर्गिक सावली नष्ट झाली. शुद्ध ऑक्सिजनची मिळणारी हवा कमी झाली. शिवाय झाडांमुळे पावसाळ्यात पडणारे पाणी जे झाडांद्वारे, झाडांच्या मुळांद्वारे जमिनीत मोठ्या प्रमाणात झिरपत जायचे आज मात्र आवश्यक संख्येत झाडेच राहिली नसल्याने ही क्रिया आता होत नाही. म्हणूनच एकेकाळी जमिनीत विहीर घेताना जिथे २५ ते ३० फूट खांदल्यानंतर पाणी लागायचे, तिथे आता ३०० ते ५०० फूट खोल बोअर मारावे लागत आहे. यावरून हे लक्षात येते की, आपणच आपल्या हातून आपला विध्वंस करू लागलो आहोत. जेव्हा लोकसंख्या कमी होती, तेव्हा झाडे भरपूर होती. यामुळे जमिनीत पाण्याची साठवण मोठ्या प्रमाणात होत होती. कमी लोकसंख्येमुळे पाण्याचा वापरही कमी होता. आजच्यासारखे ग्लोबल वार्मिंग चे वातावरण नव्हते. म्हणून पाण्याचा वापरही कमी व्हायचा. आज मात्र दिवसेंदिवस रूक्ष व रखरखत्या वातावरणामुळे वाढत जाणारे ऊन आणि त्यामुळे होणारी आपल्या जीवाची लाहीलाही, काही प्रमाणात सुसह्य करण्याकरिता आपण दिवसातून दोन वेळा आंघोळ केली तरी कमी वाटते. दिवसात दोन-तीन वेळा आंघोळ करून आपण आपल्या जीवाची लाहीलाही काही प्रमाणात कमी करण्याचा प्रयत्न करत आहोत. परंतु आंघोळीसाठी लागणाऱ्या पाण्याचं काय? हा विचार कधी आपल्या मनाला शिवत नाही. आज आपण सर्वजण उन्हाळ्यात शरीराला आणि मनाला तृप्त करण्यासाठी दररोज पैसे देऊन पाणी विकत घेतोय. ते थंडगार जार सुद्धा आता दिवसेंदिवस महाग होत चालले आहेत. मात्र या थंडगार पाण्याचे आपल्याला दररोज पैसे मोजावे लागतात. याकडे सुद्धा आपले गांभीर्याने लक्ष जात नाही. लक्षात घ्या आज आपण पिण्यासाठी पैसे देऊन जारचे पाणी विकत घेऊ लागलोय मात्र अशाच प्रकारे सृष्टीबद्दल आपल्या मनात अनास्था राहिली तर ते दिवस दूर नाही जेव्हा आपल्याला आंघोळीलाच काय शौचास जाण्यासाठी सुद्धा विकतचे पाणी घेऊन जावे लागेल. पैसे देऊनही पाणी मिळणार नाही. असे होईल तेव्हा माणूस म्हणून आपण काय करू शकाल? तर काहीच नाही. कारण साप निघून गेल्यावर जसे जमिनीवर दांडकं आपटून उपयोग नसतो किंवा चिमण्या शेतातील कंसाला खाऊन गेल्यावर पश्चाताप करून उपयोग नसतो. तशीच अवस्था तेव्हा माणसासमोर निर्माण होईल. पूर्वी आपल्या देशात राजे-महाराजे सत्ताधीश होते. कमी शिकलेले किंवा काहीच न शिकलेले सुद्धा होते. तरीसुद्धा त्यांनी आजच्यासारख्या शाळा, शिक्षण देणारी मोठमोठी संस्थाने नसताना पर्यावरणाला व प्रकृतीला सांभाळण्याचे बहूमूल्य कार्य केले. प्रत्येक लहान मोठ्या रस्त्यांच्या दुतर्फा चांगली मजबूत भारतीय झाडे लावली, नव्हे ती टिकवली सुद्धा. झाडांची निगा राखली म्हणून शेकडो वर्षांपूर्वी लावलेली झाडे आज सुद्धा कुठे ना कुठे काही प्रमाणात माणसाला सावली, ऑक्सीजन आणि पाणी देत आहे. आज एवढ्या मोठ्या प्रमाणात शिक्षण घेतलेलो आपण, आपले लोकप्रतिनिधी, सत्ताधारी, विरोधक मुबलक प्रमाणात पैसा असताना, हाताशी सगळ्या यंत्रणा असताना सुद्धा फक्त नवीन रस्ते बनविण्याचे काम करतोय. रस्ते रुंदीकरणाचे काम करतोय परंतु रस्त्यांचे रुंदीकरण करताना जी झाडे तोडली जातात त्याप्रमाणे नवीन झाडे मात्र लावल्या जात नाहीत. यामुळे आज कोणत्याही रस्त्यांवरून जाताना रस्त्याच्या दुतर्फा काय दिसून येते तर रूक्ष झालेली राने-वने, रस्त्याचे दोन्ही कडील साईड पंखे. हीच अवस्था यापुढेही राहिली तर आपला सुजलाम सुफलाम असलेला भारत देश पुढील काही काळात वाळवंट झाल्याशिवाय राहणार नाही. आज आपल्या देशात लोकसंख्येच्या मानाने एवढी तेवढी नाही तर चक्क ५०० कोटी झाडे कमी आहेत. आता जून महिन्याचा एक आठवडा उलटून गेला आहे. दरवर्षीप्रमाणे यावेळी ही ५ जूनला जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला आहे. आता ७ जून पासून पावसाळ्याचा हंगाम सुरू होणार आहे. तेव्हा पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याचा झाडे लावण्यासाठी उपयोग करून घेता येईल. आपण राहतो तिथेही आणि रस्त्याच्या कडेलाही शक्य होईल तिथे या पावसाळ्याच्या हंगामात झाडे लावण्यास सुरुवात करा. झाडे लावताना हे लक्षात ठेवा की, चांगली मजबूत व भारतीय झाडेच लावा. लावलेली झाडे पावसाळ्याच्या चार महिन्यात तगली तर ती हमखास मोठी होतात आणि त्याचा लाभ माणसांसोबतच पशु-पक्ष्यांनाही होतो. तेव्हा नागरिकांनो, शासन-प्रशासनाकडून आलेले झाडे लावा-झाडे जगवा हे ब्रीद फक्त बोलून, सांगून, ऐकून, वाचून किंवा लिहून उपयोग नाही तर यासाठी झाडे लावण्याची खरी गरज आहे. लावलेली झाडे निगा राखून मोठी करण्यासाठी मेहनत घेणे आवश्यकच नाही तर अत्यंत आवश्यक आहे, हे लक्षात घ्या.



झाडे जगवणारी वाडा संस्कृती नष्ट

काही काळापूर्वी गरीबातील गरीबाचे घर दगड मातीचे जरी असले तरी एक वेळ त्याच्या घरात खोल्या छोट्या छोट्या असायच्या परंतु अंगण मोठे असायचे आणि त्या अंगणात किमान एक दोन झाडे तरी लावलेली असायची. तीही शुद्ध भारतीय झाडे, परंतु कालौघात आता वाडा संस्कृती मोडीत निघाली, नष्ट झाली आहे. त्याची जागा पक्क्या घरांनी घेतली. यामुळे अंगण विरहित घरांचे बांधकाम होऊ लागले. अंगणच नसल्याने साहजिकच झाडे लावण्याकडे ही कोणाचा कल राहिला नाही. कमीत कमी जागेत जास्तीत जास्त खोल्या कशा निर्माण करता येईल याकडे माणसाचा दृष्टिकोन वाढला आहे. वाडे नष्ट झाले, अंगण नष्ट झाले, झाडेही नष्ट झाली आहेत.

आजकाल कमी जागेत जास्तीत जास्त बांधकाम व खोल्या कशा काढता येतील, याकडे सर्वसामान्यांसह बिल्डरांचाही कल वाढला आहे. यामुळे दिवसेंदिवस झाडांचा नायनाट होत चालला आहे. ही परिस्थिती अत्यंत विदारक स्थितीत गेली आहे. म्हणून आता शासन-प्रशासनाने कडक पावले उचलण्याची गरज आहे. ज्या-ज्या इमारती बांधून तिथे लोक राहत आहेत अशा इमारतींच्या चारही बाजूने झाडे लावण्याची सक्ती करण्यात यावी. तसेच नवीन इमारतींना परवानगी देण्याअगोदर इमारतीच्या चारही बाजूंनी मजबूत भारतीय झाडे लावण्याची सक्त ताकीद देऊन तसे बंधन घालावे. जो कोणी नवीन इमारतीच्या चारही बाजूने झाडे लावणार नाही, त्याला इमारत बांधकामाची परवानगी देण्यात येऊ नये. जोपर्यंत असे कडक पाऊले उचलली जाणार नाहीत तोपर्यंत झाडे तोडून होत असलेला पृथ्वीचा ऱ्हास थांबणार नाही.

**-एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार)**
आसेफ़नगर, बीड
संपर्क - ९०२१ ०२ ३१२१

# राजपिंपरी शिवारातील पालख्या डोंगरावरील पवनचक्की कोसळली!

## सुदैवाने कुठलीही जीवितहानी नाही; परिसरात मोठी खळबळ

### इतर पवनचक्की मजबूत आहेत की, नाही हे तपासणी करण्याची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात एक पवनचक्की कोसळली आहे. पालख्या डोंगरावर ही घटना घडली आहे. डोंगरावरची पवनचक्की अचानक कोसळल्याने आजूबाजूच्या परिसरात खळबळ उडाली आहे. पालख्या डोंगरावरील पवनचक्की पडली त्यात सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. ज्या वेळी पवनचक्की पडली त्यावेळी त्या डोंगराच्या परिसरात कोणीच नव्हते. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. पवनचक्की कोसळतानाचा व्हिडिओ मोबाईलमध्ये शुट करण्यात आला आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

गेवराई तालुक्यातील डोंगराळ परिसरात खाजगी कंपन्यानी अनेक पवनचक्क्या उभारल्या आहेत. त्यातीलच एक पवनचक्की अचानक जमिनीवर कोसळली. पवनचक्कीच्या सुरक्षेबाबत कोणतीही काळजी घेत नसल्याचे समोर आले आहे. पवनचक्कीची व्यवस्थित काळजी न घेतल्याने, वेळेवर सुधारणा केल्याने ही दुर्घटना घडल्याने सांगण्यात येत आहे. ही दुर्घटना झाल्यानंतर गावकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. इतर पवनचक्की उत्तम अवस्थेत असतील की नाही याबाबत गावकऱ्यांच्या मनात शंका निर्माण झाली आहे. त्यामुळे इतर पवनचक्की मजबुत आहेत की नाही याबाबत तपासणी करावी, अशी मागणी आता केली जात आहे.



# कला ( आर्ट्स )शाखेच्या विद्यार्थ्यांना सरकारी क्षेत्रात नोकरीची संधी

सध्या कला शाखेच्या विद्यार्थ्यांना इतर शाखांपेक्षा सरकारी नोकरीच्या अनेक संधी चालून येत आहेत याला कारण आहे ते म्हणजे सरकारी भरती परीक्षेमध्ये आर्ट्स मध्ये असणाऱ्या विषयांचा अभ्यासक्रम जास्त विचारला जातोय. दहावी मध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त मार्क असणाऱ्या आणि मध्यम मार्क्सच्या विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता चांगली असते व कला शाखेचा अभ्यासक्रम अत्यंत सोपा असल्याने तो लवकर आत्मसात होतो आणि विद्यार्थी कॉलेज वयातच सरकारी नोकरी मिळू शकतो.

१) आर्ट्स मधून शासनाच्या महत्त्वाच्या पदावर संधी:- दरवर्षी शासकीय अनेक पदांची भरती होते . यात पोलीस तलाठी,लिपिक, कृषी विभाग,आरोग्य विभाग,ग्राम विकास विभाग, गृह विभाग, पशुसंवर्धन विभाग,सार्वजनिक बांधकाम विभाग अशा शासनाच्या अनेक विभागांमध्ये क्लास १, क्लास २,आणि क्लास ३ पदावर अधिकारी होण्याच्या संधी यासाठी असते फक्त अकरावी बारावी आर्ट्सच्या अभ्यासक्रम शिकण्याची व त्याबरोबर एमएससीआयटी टायपिंग चा अल्पमुदतचा कोर्स करण्याची गरज असते.

२) १२ वी आर्ट्स नंतर दर्जेदार विषयातून मिळणाऱ्या पदव्या

बऱ्याच जणांचा गोड गैरसमज आहे की आर्ट्स पदवीला किंमत नाही पण हे साफ चुकीचे आहे. आर्ट्स मधून बारावीनंतर बीए इंग्रजी, अर्थशास्त्र,मानसशास्त्र,भूगोल,इतिहास, राज्यशास्त्र,समाजशास्त्र,तत्त्वज्ञान, संगीत,मानव वंशशास्त्र, मराठी, हिंदी यासारख्या दर्जेदार विषयात पदवी घेता येऊ शकते.तसेच पदवीनंतर एमएसडब्ल्यू, एमबीए एमसीए,लॉ , पीएचडी,जर्नालिझम, डिझायनिंग, कॉम्प्युटर नेटवर्किंग, यासारखे नोकरी देणारे कोर्सेस करता येऊ शकतात. तसेच पदवीनंतर बँकिंग मध्ये सुद्धा बीपीएस, आरबीआय, एसबीआय,इन्शुरन्स कॉर्पोरेट व्यावसायिक क्षेत्रात आठच्या विद्यार्थ्यांना परीक्षा मार्फत संधी उपलब्ध होते.



३) पालकांनो इंजिनिअरिंग व डिप्लोमा चे वेळ सोडा .

पालकांना इंजिनिअरिंग व डिप्लोमा चे लागलेले वेड व आपल्या अपेक्षांचे ओझे मुलांना स्वतःपासून दूर व खाजगी क्लास कडे घेऊन जात आहे. इंजिनिअरिंग होऊनही अक्कल शून्य व्यक्तीच्या हाताखाली डे नाईट शिफ्ट वाईस काम करावे लागते त्यामुळे हुशार मुलांचे आयुष्य उध्वस्त होऊ लागले आहे हे वास्तविक सत्य समाजात समोर आले आहे.

४) सायन्स व कॉमर्स मध्ये खाजगी नोकरीची संधी परंतु खर्च जास्त

सायन्स व कॉमर्सची मुले बारावीनंतर डिप्लोमा इंजिनिअरिंग किंवा इतर कंपनीला आवश्यक कोर्सेस करतात परंतु त्याचा परिणाम म्हणजे त्यांना खाजगी कंपनीमध्ये जॉब करावा लागतो. तसेच डॉक्टर व सीए होण्यासाठी भरपूर पैसा खर्च करावा लागतो तो उपलब्ध होत नाही. सायन्स व कॉमर्सचे शिक्षण घेत असताना संपूर्ण दिवस अभ्यास व प्रॅक्टिकल मध्ये जातो त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण वाढतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान कमी मिळते. काही वेळा आपण विद्यार्थी आत्महत्या करताना सुद्धा पाहतो.आणि नंतर शेतात काम करण्याची सुद्धा लाज वाटते हे भयान वास्तव आपण आज पाहत आहोत. यामध्ये कमी मार्क्स पडले की तुटपुंज्या पगारावरती खाजगी कंपनीमध्ये काम करावे लागते.

५) कला शाखेमुळे मिळते स्थैर्य आणि व्यवहारिक ज्ञान:-

कला शाखेमुळे मुलांमध्ये शारीरिक,मानसिक,व्यवहारिक आणि कौटुंबिक स्थैर्य निर्माण होते. कला शाखेमुळे मुलांना क्रीडा,एनसीसी, एनएसएस, होमगार्ड,सांस्कृतिक सामाजिक सेवा यामध्ये कॉलेज जीवनामध्ये सहभाग घेता येतो. तसेच कॉलेजमध्ये स्टेट,नॅशनल लेव्हल पर्यंतचे प्रमाणपत्र मिळवून सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळते.

६) स्पर्धा परीक्षेसाठी आर्ट्स चा परीपूर्ण अभ्यासक्रम :-

आजचे युग स्पर्धा परीक्षेचे असल्यामुळे शासनाच्या सर्व पदांची भरती ही स्पर्धा परीक्षा घेऊन केली जाते. त्यासाठी कला (आर्ट्स ) शाखेचा अभ्यासक्रम विचारात घेतला कला शाखेची मुले पटकन सरकारी नोकरी मिळवतात. इयत्ता आठवी ते दहावी गणित आणि विज्ञान, इतिहास,भूगोल, राज्यशास्त्र,समाजशास्त्र, अर्थशास्त्र मानसशास्त्र,मराठी व्याकरण,इंग्रजी व्याकरण इयत्ता अकरावी व बारावीच्या विषयावर प्रश्न विचारले जातात. तसेच चालू घडामोडी सुद्धा राजकीय, सामाजिक आर्थिक क्रीडा, भौगोलिक, मानसिक या आर्ट्सच्या विषयावर आधारित असतात. म्हणून आपल्या मुलांना बहुआयामी व प्रतिभा संपन्न बनविण्यासाठी आणि खाजगी क्षेत्रात मजुरी करण्यापासून रोखण्यासाठी फक्त असलाच प्रवेश व शिक्षण घ्या जेणेकरून विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्वल घडेल.

# पवनचक्की कोसळण्याच्या घटनेनंतर महाजनवाडीकर दहशतीखाली

## रास्ता रोकोचा इशारा :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभाराला वैतागलेले महाजनवाडीकर काल गुरूवार रोजी गेवराई तालुक्यातील गोविंदवाडी शिवारातील पालख्या डोंगराजवळील टेंभी ताडा येथील पवनचक्की कोसळल्याने दहशतीखाली असुन महाजनवाडी येथील पवनचक्की प्रकल्पाच्या अपघात प्रवण क्षेत्रात असलेल्या ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी व न्यायालयात दाद मागितल्यानंतर अखेर रस्त्यावर उतरून लढाई करण्याचे ठरवले असुन लवकरच रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.



महाजनवाडी शिवारात गट नंबर ४९६,४९७,४२१व ५०१ मध्ये वडिलोपार्जित समाईक असलेली जमीन कुटुंबातील ६ व्यक्तींच्या नावावर असुन या समाईक क्षेत्राचे महसूल अभिलेखात ७/१२ पत्रकावर शेतजमिनीचे आपसांत तंतोतंत आजतागायत वाटप झालेले नाही.पवन उर्जा कंपनीने जमिनीच्या ६ मालकांपैकी केवळ दोघांच्या संमतीने सहा एकर जमिन १८ वर्षे ११महिन्यांसाठी भाडे तत्वावर दुय्यम निबंधक जिल्हा कार्यालय बीड येथे नोंदणी करून घेतली आहे. ईतर ४ जमिन मालकांना याची कल्पनाही नाही.संबधित प्रकरणात जिल्हा बीड आणि न्यायालयात दावा दाखल केला असुन कंपनीला नोटीस पाठवली आहे.नियमा नुसार २३० मिटर अंतरामध्ये कच्चे अथवा पक्के घर म्हणजे रहिवास नसावा ही अट असताना १०० मिटरवर लोकवस्ती आहे.विशेष म्हणजे पवनचक्की प्रकल्पाची जागा अगोदर मोजणी करताना दुसरीच होती.मात्र नंतर लोकवस्ती मध्ये प्रकल्प उभारण्यात आला आहे.

पवनचक्की पासुन आमचं राहतं पक्कं सिमेटचं घर आणि कोठा १०० मीटर अंतरावर असुन काल गेवराई येथील पवनचक्की कोसळल्यानंतर आम्हाला आमच्या व जनावरांच्या जिवाची जास्त भिती वाटु लागली असुन हा प्रकल्प दुसरीकडे हलवावा.अशी मागणी शारदा घरत यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील पवनचक्की कंपन्यांकडून अज्ञानी शेतकऱ्यांची दिशाभूल आणि आर्थिक लुबाडणूक होत असून जिल्हा प्रशासनाला लेखी तक्रारी नंतर सुध्दा शेतकऱ्यांना न्याय देण्याऐवजी महसूल आणि पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांचीच पाठराखण करत पुढा-यांच्या सांगण्यावरून पिडीत शेतकऱ्यांना धमकावण्याचे प्रकार घडत असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात लवकरच मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावर महाजनवाडी फाट्यावर रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.



बीड गोवींद कार चे टॉप सिए शहारूख भाई पठान यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना जनरल मॅनेजर राहुल तेलगुटे, अमरीश शहाणे, रईस देशमुख, एजाज पटेल, रवी लांडगे व टाटा मोटर्स गोवींद कारचे सर्व पदाधिकारी व मित्र परीवार उपस्थित होते.

# बीड जिल्ह्याच्या शिरोपात आणखी एक तुरा

## बीडचे उपनिरीक्षक सूर्यकांत उर्फ राजू गुळभिळे यांचा राष्ट्रपती पदक देऊन गौरव....

मुंबई -बीड पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत (राजु)तुकाराम गुळभिळे यांना राज्यपाल रुपेश कुमार बैस!हास्ते आज मुंबई राजभावनात राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले असून यामुळे बीड जिल्ह्याच्या शिरोपात आणखी एक तुरा लागला असून बीड जिल्हा पोलीस दलातील आपल्या कार्यतत्परता,आणि कर्तव्य दक्षतेमुळे राजू गुळभिळे हे सुपरिचित असून त्यांच्या कार्यपद्धतीचा खूप मोठा चाहता वर्ग असून सामाजिक कार्यात विशेषता निराधार मध्ये ते गेल्या अनेक वर्षापासून खूप मोठे कार्य करत असून गुन्हेगारी प्रवृत्ती आणि नशे च्या अधीन झालेल्या शेकडो तरुणांना त्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात अन्याय चे कार्या केले असून यांची दखल घेत बीड चे पोलिस उपनिरीक्षक

सुर्यकांत तुकाराम गुळभिळे यांना २०२१ राष्ट्रपती पदक देण्याची घोषणा करण्यात आली होती.याचे वितरण आज मुंबई येथील राज्यभावनात राज्यपाल रुपेश कुमार बैस यांच्या हस्ते झाले असून यावेळी सह पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई चे महासंचालक विवेक फणसाळकर, गृह विभागाचे मुख्य सचिव यांच्यासह परिवार आणि मान्यवरांची उपस्थिती होती.



# कृषी सेवा केंद्र चालकाकडून होणारी शेतकऱ्यांची लुट थांबवुन तत्काळ कारवाई करावी – गणेश बजगुडे पाटील

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वरुण राज्याच्या आगमनानंतर शेतकरी बी बियाणे खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत धाव घेत असताना कृषी सेवा केंद्र चालकाकडून बी बियाणे उपलब्ध असताना देखील जाणीवपूर्वक कृत्रिम टंचाई निर्माण करुन मोठ्या प्रमाणात बियाणांचा काळा बाजार केला जात आहे. बियाणांचा साठा मोठ्या प्रमाणात असताना देखील टंचाई निर्माण करायची व तेच बियाणे शेतकऱ्यांना जास्तीच्या दराने विक्री करण्याचा प्रकार बीड मध्ये सरास होत असुन कृषी अधिकाऱ्यानी याकडे डोळझाक नकरता शेतकऱ्यांची होणारी फसवणुक थांबवुन साठेबाज कृषी सेवा केंद्राची गोडवून

तपासणी करावी त्याच बरोबर त्यांच्याकडे किती माल आलेला आहे व त्यांनी किती व कोणाला विक्री केलेला आहे याची तपासणी करावी दोषी व्यापाऱ्यांवर तत्काळ कारवाई करून शेतकऱ्यांना मागेल ते बियाणे योग्य दरात उपलब्ध करून देण्याचे आवाहन बीड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.



# बीडच्या माजलगाव तालुक्यातील हिवरा या गावांमध्ये वीज पडून बारा मेंढ्यांचा मृत्यू

## तात्काळ पंचनामे करून, मेंढपाळांना तातडीने मदत करा, शारदा पांढरे

बीड ।प्रतिनिधी

बीडच्या माजलगाव तालुक्यातील हिवरा या गावांमध्ये रात्री अचानक झालेल्या वादळी वाऱ्याच्या विजेच्या कडाक्याने रामकिसन टकले या मेंढपाळांच्या तब्बल बारा मेंढ्या वीज पडून मृत्यू झाल्या आहेत ही घटना माजलगाव तालुक्यातील हिवरा या गावी घडले आहे, या मेंढपाळांचा तब्बल दोन लाखाचा मोठ्या प्रमाणात नुकसान झालेला आहे, तात्काळ पंचनामे करून या मेंढपाळाला आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी होत आहे, सदरील पंचनामे करून मेंढपाळांना तात्काळ मदत करण्यात यावी अशी मागणी मेंढपाळांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका मांडणाऱ्या शारदा पांढरे यांनी केले आहे



# खालापूरी येथे सामाजिक कार्यकर्ते डॉ.जितीन वंजारे यांचा वाढदिवस सामाजिक कार्यक्रमानी साजरा झाला

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक राजकीय वैद्यकीय क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खालापूरी गावचे भूमिपुत्र सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक कार्यक्रमानी साजरा करण्यात आला. उन्हाळ्यामध्ये दिवसेंदिवस ग्लोबल वार्मिंग वाढत असल्या कारणाने व जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून खालापूर मध्ये वृक्षरोपण आणि वृक्ष वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्याचबरोबर गोरगरीब रस्त्यावरील लोकांना अन्नदान ही करण्यात आले. आपला वाढदिवस लोकांच्या हिताचा ठरावा हे ब्रीद लक्षात ठेवून प्रत्येक वर्षी डॉ वंजारे हे त्यांचा वाढदिवस विविध सामाजिक कार्यक्रमांनी साजरा करतात.वाढदिवसानिमित्त त्यांनी त्यांच्या क्लिनिक मध्ये मोफत डोळे तपासणी शिबिर ठेवले होते .त्याच बरोबर अनाथ आश्रमाला अन्नदान करून अनाथांचा नाथ होण्याचे भाग्यही प्राप्त केले.स्वतःचा प्रपंच संसार आणि व्याप यातून वेगळं जाऊन समाजहित जपल गेलं पाहिजे आपण लोकांच्या कायम कामाला आल पाहिजे हीच भावना डॉ. जितीनदादा वंजारे खालापूरीकर नेहमी जपत असतात आणि याच भूमिकेतून दिवसेंदिवस त्यांची सामाजिक ओळख निर्माण होत असून सामाजिक कार्यतत्परता आणि कार्यसम्राट असणाऱ्या ह्या राजकीय वारसा नसणाऱ्या शेतकरी कष्टकरी पुत्राला आज ना उद्या राजकीय क्षेत्रातही यश मिळेल यात शंका नाही.राजकारणात उच्च सुशिक्षित लोकांची भर पडली पाहिजे त्यांच्या ज्ञानाचा प्रकाश लोकांपर्यत गेला पाहिजे.धर्मवाद, प्रांतवाद,जातीयवाद,भाषावाद दूर करून आपण एकरूप समतावादी सार्वभौम राष्ट्र निर्मितीसाठी सुशिक्षित लोकांना राजकीय धुरा दिली गेली पाहिजे विकास हा तळागाळापर्यंत पोहचला पाहिजे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचला पाहिजे,देशातील लोकशाही मजबूत झाली पाहिजे संविधान जिवंत ठेवून कायदा हक्क अधिकार कायम जिवंत ठेवले पाहिजे आणि कृषिप्रधान देशात शेतकरी सुखी झाला पाहिजे असे कणखर पक्के विचार असणाऱ्या



डॉ जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांना वाढदिवसानिमित्त सर्वच स्तरातून शुभेच्छाचां वर्षाव होत आहे .युवक,विद्यार्थी,शेतकरी, कष्टकरी,दीन दलीत, शोषीत, पिडीत,आदिवासी,शेती, कामगार,कर्मचारी वर्गासाठी विशेष काम करणाऱ्या डॉ जितीनदादा वंजारे यांना गोरगरीब जनतेचे शुभाशीर्वाद मिळत असून त्यांची लोप्रियता दिवसेंदिवस परिसरात वाढत आहे. टाकळी मानूर येथेही त्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा झाला. वैद्यकिय आणि सामाजिक सेवेतून मोठी ओळख निर्माण करून लोकांच्या हितासाठी हक्क अधिकार आणि जुलामा विरुद्ध जाहीर बंड पुकारून शासन दरबारी कायद्यान्वये गरिबांची बाजू घेणाऱ्या अन्याय विरुद्ध लढणाऱ्या आणि आपल्या लेखणीतून सडेतोड खर सत्य आणि निर्भिड लेखन करणाऱ्या ह्या अवलियास वाढदिवसाच्या अनंत कोटी शुभेच्छा देण्यासाठी खालापूरी गावातील असंख्य तरुण,वयोवृद्ध,मार्गदर्शक, आप्तेष्ट,मित्रगण,अबालथोर उपस्थित होते यावेळी तंटामुक्ती चे अध्यक्ष शिवसेना नेते रशीदमामु शेख,शिवसंग्राम नेते कृष्णा परजने,एन सी पी नेते किरण भागवत परजणे,ग्राम सदस्य सुरेशभाऊ परजने, मनसे नेते सचिन परजने,सैनिक नितीन वंजारे,हभप उद्धव नाना काळे, वक्रंगी चे राधाअण्णा परजने,शिक्षण समितीचे विनायक गवळी, वंचित चे अक्षय लोंढे,संजय लोंढे, हभप भारती महाराज,उद्योजक अप्पादादा उगले,महादेव परजने,युसुफ पठाण,सावता डोके,संजय उगले, बालू परजने,विलास परजने, रा.प.मंडळाचे अर्जुन डोके,मराठा समन्वय धनंजय परजने,राजू काळे,बाळासाहेब परजने,चंदू खरपाडे, ज्ञानेश्र्वर परजने,गणेश परजने,राजेंद्र परजने,निलेश परजने,बाबू परजने,बळीराम परजने, गुड्डू परजने,कृष्णा खरपाडे,कृष्णा उगले,सचिन डोके,सचिन वंजारे, इंजी.संजय महाकुडे,गणेश उगले,इत्यादीसह अनेकजण उपस्थित होते.

# डफडे वाजवायला आला नाही म्हणून शिवीगाळ

## करंजवन फाटा येथील घटना : पाच जणांविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटी गुन्हा दाखल

पाटोदा ।प्रतिनिधी

तालुक्यातील करंजवन फाटा येथे गेलेल्या जवळाला येथील काही युवकांनी रवींद्र कचरू पौळ यांच्या घरी जात जातिवाचक शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. ४ जून रोजी रात्री ही घटना घडली. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध अनुसूचित जाती जमाती प्रतिबंध अधिनियम (अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, ४ जून रोजी रात्री आरोपी रमेश जगदाळे व त्याचे सहकारी पौळ याच्या घरी गेले व तु डफडे वाजविण्यासाठी येण्याचे सांगितले. यावर पौळ यांनी त्यांचे काही सहकारी डफडे वाजविण्यासाठी बाहेरगावी गेले आहेत ते आल्यानंतर येतो, असे म्हणताच आरोपींनी फिर्यादी पौळ यांना जातिवाचक शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. पौळ यांनी शिवीगाळ करू नका म्हणताच आरोपींनी फिर्यादीचे वडील आई, पत्नी, भावजयी, बहीण, मुलगी, यांनाही मारहाण केली.

# पंकजाताई मुंडेंचा पुढील आठवड्यात आभार दौरा ; सर्व तालुक्यात जावून घेणार मतदारांची भेट

## या संघर्षात न घाबरता आपण जो लढा दिला त्याबद्दल आपल्या सर्वांचा मला खूप खूप अभिमान वाटतो

निवडणुकीत अथक परिश्रम करणाऱ्या सर्वांचे मनापासून मानले आभार

परळी ।प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले, अथक परिश्रम घेतले, कुठल्याही गोष्टीची अपेक्षा न ठेवता काम केले त्या सर्वांचे भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी मनापासुन आभार मानले आहेत. पुढील आठवड्यात म्हणजे १२ किंवा १५ तारखेपासून आपण पूर्ण जिल्हाभरात आभार दौरा करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सर्वच्या सर्व अकराही तालुक्यात जावून मतदारांची भेट घेऊन त्यांचे आभार मानणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.



यासंदर्भात सोशल मिडियावर एका व्हिडिओ संदेशाद्वारे पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त करत मतदारांचे आभार मानले. त्या म्हणाल्या, माझ्यावर प्रेम करणाऱ्या महाराष्ट्रातील समस्त कार्यकर्त्यांचे खूप खूप आभार. ज्या ज्या ठिकाणाहून तुम्ही माझ्यासाठी प्रयत्न केले, प्रार्थना केल्या, माझ्यासाठी नवस बोलले, माझ्या यशाची कामना केली त्याबद्दल सर्वांचे आभार आणि त्या ६ लाख ७७ हजार मतदारांचेही मनापासुन आभार ज्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत मला मतदान केलं. या देशामध्ये सर्वात कमी मतांनी निवडून आलेली जागा बीडची असेल आणि सर्वात कमी मतांनी पडलेली पहिल्या अथवा दुसऱ्या नंबरची माझी जागा असेल, म्हणजे इतकी टफ फाईट अत्यंत विपरित परिस्थितीत मी देऊ शकले ते केवळ आणि केवळ तुमच्या सर्वांच्या जीवावर..

### मी लवकरच येत आहे, तुम्हाला भेटायला

पक्षाच्या बैठका असल्याने मी मुंबई, दिल्लीला जाईल, त्यानंतर मी १२ किंवा १५ तारखेपासून आभार दौरा करणार आहे. तुमच्या सर्वांपर्यंत मी येणार आहे. तुमचे आभार मानण्यासाठी आणि तुमचे आशीर्वाद घेण्यासाठी! संघर्ष हा आपल्या जीवनात पाचवीला पूजला आहे. या संघर्षात न घाबरता आपण जो लढा दिला त्याबद्दल आपल्या सर्वांचा मला खूप खूप अभिमान वाटतो असंही पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

# टाकरवण येथे शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहा साजरा

टाकरवण ।प्रतिनिधी

येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर शिवस्वराज्य गुढी उभारून शिवराज्याभिषेक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सरपंच सुनील तौर यांच्या हस्ते स्वराज्य गुढी उभारण्यात आली. स्वराज्यध्वजासह शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारुन त्यास अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन करुन गावकऱ्यांच्या उपस्थितीत शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच सुनील तौर, उपसरपंच दयानंद गोबरे, जनार्धन आडागळे, सतीश राठोड, खंडू आडागळे, पंचशिला खरात यांच्यासह आदी ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी उपस्थित होते.




# भरधाव ट्रॅक्टरवरील ताबा सुटला, भीषण अपघातात चालकाचा मृत्यू

टाकरवण (बातमीदार)

भरधाव ट्रॅक्चरचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅक्टरची ट्रोली पलटी होऊन चालकाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवार (ता. ५) रोजी टाकरवण शिवारात घडली आहे. सचिन चव्हाण असे अपघातात मृत्यू झालेल्या ३२ वर्षीय ट्रॅक्टरचालकाचे नाव आहे.

सचिन सुंदर चव्हाण हा आपल्या ताब्यातील ट्रॅक्टरणे शेताकडून टाकरवणच्या दिशेने येत होता. टाकळगव्हाण – टाकरवण रस्त्यावर वाहनावरील ताबा सुटला आणि ट्रॅक्टर रस्त्याच्या बाजूला असलेल्या वितरीकेत गेल्याने ट्रोली पलटी होऊन भिषण



आपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच जवळच्या लोकांनी घटनास्थळी दाखल होत बचावकार्य सुरु केले. यावेळी सचीन हा ट्रोली खाली दबला होता त्याला बाहेर काढत तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र सचीन चव्हाण याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# महाराष्ट्र ग्रामीण बँक प्रायोजित महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रा

**टाकरवण (बातमीदार)**

**शेतकरी वर्गाला पिक कर्ज नुतनीकरण, व्याज परतावा तसेच शासनाच्या प्रोत्साहनपर योजनेचे महत्व पटवून सांगण्यासाठी व त्यांच्यासोबत संवाद साधण्यासाठी महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचे दि.५ जून ते १५ जून दरम्यान आयोजन करण्यात येत आहे. संपूर्ण मराठवाड्यात तब्बल ५० ठिकाणी कार्यक्रम घेण्यात येणार असून या दरम्यान तब्बल २००० नियमित पिक कर्ज धारकांचा सत्कार तसेच संपूर्ण यात्रेदरम्यान २००० झाडांचे वृक्षारोपण देखील बँकेमार्फत करण्यात येणार आहे.**

सदर यात्रा हि ता १० सोमवार रोजी किट्टीआडगाव येथे सकाळी आठ वाजता येणार असून त्या दरम्यान -ढच् मशीन चे प्रात्यक्षिक तसेच आर्थिक समावेशन, डीजीटल साक्षरता आणि सामाजिक सुरक्षा योजनांबद्दल जनजागृती, नियमित पिक कर्ज धारकांचा सत्कार करण्यात येणार आहे. बँकेचे सर्व सन्माननीय ग्राहक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, बचत गटातील महिलावर्ग तसेच संबंधित शासकिय यंत्रणेतील अधिकारी व कर्मचारी या सर्वांनी किट्टीआडगाव येथे येणाऱ्या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेत मोठ्या संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेमार्फत करण्यात आले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT